# मराठा आरक्षणाचा ठराव आज मांडणार

## विरोधकांच्या कोंडीची सरकारची खेळी



हिवाळी अधिवेशन

सकाळ न्यूज नेटवर्क

नागपूर, ता. ५ : मराठा समाजाने आयोजित केलेल्या संपूर्ण राज्यातील मोर्चांचा लाभ घेण्यासाठी विरोधक प्रयत्नशील असतानाच देवेंद्र फडणवीस सरकारने पुढाकार घेत उद्या (ता. ६) या संबंधात प्रस्ताव मांडण्याचे ठरवले आहे. नागपूर अधिवेशनात मराठा मोर्चांचा विषय गाजेल, सरकारला या विषयावर अडचणीत आणता येईल, अशी व्यूहरचना विरोधक आखत असतानाच सत्ताधारी आघाडीनेच हा प्रस्ताव पुढे आणण्याचा निर्णय घेतला आहे.

विधीमंडळ कामकाजाच्या नियमांनुसार दर मंगळवारी सत्ताधारी पक्षातर्फे ठराव मांडला जातो. हा ठराव व त्याचा तपशील काय असावा हे ठरवण्याचा अधिकार सत्ताधारी आघाडीला असतो. भाजपच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत पहिल्याच आठवड्यात सरकारने चढाईचे धोरण स्वीकारून या संबंधात आपण आजवर केलेल्या कामाची पुन्हा एकदा घोषणा करावी असे ठरवले आहे. मराठा समाजातील मोर्चेकऱ्यांना शांत करण्यासाठी सरकारने युवकांना; विशेषत: विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सवलत मिळावी, यासाठी निर्णय घोषित केले आहेत. ६० टक्क्यांवर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थांना आर्थिक निकषानुसार सवलत तसेच युवकांनी उद्योग सुरू करावेत, यासाठी पतपुरवठा उपलब्ध करून देणे या फडणवीस सरकारने केलेल्या मोठ्या घोषणा आहेत.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे,

पान ८ वर »

### आशिष शेलार मांडणार ठराव

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि या अधिवेशनात विधिमंडळ कामकाजाचा भार सांभाळणाऱ्या विनोद तावडे यांनी हा ठराव मांडण्याचे ठरवले. महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा ठराव मांडतानाच शासनाने आम्ही मराठा समाजाचे निवेदन स्वीकारण्यास तयार आहोत, असे पुन्हा एकदा नमूद करावे असे सांगितले आहे. मुंबईत भाजपचे महत्त्वाचे नेते असणारे आशिष शेलार यांनी हा ठराव मांडावा असे ठरले आहे.**

# उच्च न्यायालयात २५०० पानांचे प्रतिज्ञापत्र

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ५ : मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारच्या वतीने आज मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले. या अडीच हजार पानांच्या प्रतिज्ञापत्रात मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण सिद्ध होईल, असे भक्कम पुरावे व दस्तऐवज दाखल करण्यात आले असून, समाजाच्या सामाजिक मागासलेपणासोबत कुणबी व मराठा यांच्यातील साधर्म्य दाखविणारे ऐतिहासिक पुरावेही सादर करण्यात आले आहेत.

मराठा आरक्षणाबाबत न्यायालयाने सरकारला प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना केल्या होत्या. मराठा क्रांती मोर्चाला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादानंतर राज्य सरकार काय भूमिका मांडणार, याबाबत उत्सुकता होती. आरक्षणाच्या बाजूने राज्य सरकारच्या वतीने पूर्ण अभ्यास करून या प्रतिज्ञापत्रात पुरावे सादर केले आहेत. मराठा समाजाच्या सामाजिक मागासलेपणाचे ऐतिहासिक पुरावे देताना संत तुकाराम, संत बहिणाबाई, शाहीर अज्ञानदास आदींचे संदर्भ देण्यात आले असून, ब्रिटिश राजवटीतील १८७१ ते १९३१ या कालावधीतील जनगणना अहवालाचाही आधार घेण्यात आला आहे. याशिवाय महात्मा जोतिबा फुले यांच्या लिखाणातील मराठा-कुणबी संदर्भ (शिवाजीचा पोवाडा, शेतकऱ्याचा आसूड, गुलामगिरी आदी.), शाहू महाराजांनी मराठा समाजाला दिलेल्या आरक्षणाचे गॅझेट नोटिफिकेशन, शाहू महाराजांची विविध पत्रे व भाषणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या शूद्र पूर्वी कोण होते? आणि इतर लेखनासोबतच साउथबरो कमिटी समोर दिलेली साक्ष, कम्युनल अवार्डमधील भूमिका व इतर बाबी यांचाही संदर्भ जोडण्यात आला आहे.

याशिवाय डॉ. इरावती कर्वे यांचे मराठा समाजाबद्दल वैज्ञानिक मत; गेल ओम्व्वेट यांच्या पुस्तकातील संदर्भ; वेगवेगळ्या कमिशनची भूमिका; बापट आयोगाच्या अहवालातील आरक्षणाच्या बाजूने असलेली मते व क्षेत्र पाहणी अहवालातील मुलाखती; राणे समितीने त्यांच्या अहवालात मांडलेला संख्यात्मक तपशील;

### मराठा आरक्षण

पान ८ वर »